।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

# Director, Board of Examination & Evaluation

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.
E-mail : srtmuncoe@gmail.com
srtmundboee@gmail.com

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२०–२०२१/५९३ दिनांकः ०९.११.२०२०

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व सलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: उन्हाळी २०२० (अतिरिक्त) परीक्षेसाठी **OMR MCQ** उत्तरपत्रिका वापराबाबत.
संदर्भ: परीक्षा/२०२०–२१/५७५/दिनांक ०६/११/२०२०

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय परीपत्रकास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उन्हाळी–२०२० ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षेसाठी ज्या नियीमत व बॅकलॉग विषयांच्या विद्यार्थ्यानी अंतीम वर्ष परीक्षेकरीता आवेदन पत्र भरलेले आहेत व ते उन्हाळी–२०२०, परीक्षेपासुन वंचीत राहिलेले आहेत किंवा अनुपस्थित होते अशा दोन वर्षीय अभ्यासक्रमासाठी पहिले व दूसरे सत्र, तीन वर्षीय अभ्यासक्रमासाठी तिसरे व चौथे सत्र, चार वर्षीय अभ्यासक्रमासाठी पाचवे व सहावे सत्र व पाच वर्षीय अभ्यासक्रमासाठी सातवे व आठवे सत्रातील विद्यार्थ्याची परीक्षा महाविद्यालय स्तरावर दिनांक १०/११/२०२० ते २५/११/२०२० दरम्यान घेण्यात येणार आहेत. या महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणा–या अनियमित (Backlog) विद्यार्थ्याच्या परीक्षेसाठी विद्यापीठाने पुरवठा केलेल्या मूळ MCQ उत्तरपत्रिका न वापरता त्याची झेरॉक्स काढून सदर झेरॉक्स उत्तरपत्रिकावर महाविद्यालय स्तरावर अनुक्रमांक टाकून परीक्षेसाठी वापरण्यात याव्यात तसेच या उत्तरपत्रिकांची मॅन्युअली तपासणी करून त्या सर्व उत्तरपत्रिका हया जिल्हा/तालुका संकलन केंद्रावर उपस्थिती अहवाल, प्रश्नपत्रिकेची प्रत, गुणतालिका (Answer Key) व गुणयादीसह (बैठक क्रमांकासह) दररोज जमा करावेत.

तसेच पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतीम वर्षाच्या दोन्ही सत्रातील विद्यार्थ्यांची अतिरिक्त परीक्षा विद्यापीठामार्फत दिनांक २५/११/२०२० ते ५/१२/२०२० या दरम्यान घेण्यात येणार आहेत. सदर विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी विद्यापीठाने पाठविलेल्या मुळ MCQ उत्तरपत्रिका वापरणे अनिवार्य राहिल व या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका विद्यापीठात तपासण्यात येणार असून त्या सर्व उत्तरपत्रिका, उपस्थिती अहवाल व प्रश्नपत्रिकेची प्रतसह सिलबंद करून जिल्हा/तालुका संकलन केंद्रावर दररोज जमा करावेत.

सबब, वरील प्रमाणे नोंद घेवून कार्यवाही करणेबाबत सर्व संबधीतांना कळवावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
१. मा.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा.प्र–कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
३. सर्व समन्वयक, जिल्हा/तालुका उत्तरपत्रिका संकलन केंद्र, उन्हाळी परीक्षा–२०२०.